# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८१५/२०२२

तक्रारकर्ता, श्रीम.चारुशिला दयाराम चौधरी
काळू अपार्टमेंट, बी विंग /३०२
लोकग्राम कल्याण पूर्व, जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
नालंदा माध्यमिक विद्यालय, कल्याण पूर्व
ता.कल्याण, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
नालंदा माध्यमिक विद्यालय, कल्याण पूर्व
ता.कल्याण, जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/३/२०२१ | २२/४/२०२१ | २२/४/२०२१ | १५/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२४/३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती शारदा रविंद्र गायकवाड, मुख्याध्यापिका, नालंदा माध्यमिक विद्यालय, कल्याण पुर्व उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *सौ मिनाक्षी विवेक बर्वे सह शिक्षिका ना.मा.वि यांचे नेमणुक पत्र झेरॉक्स मिळण्याबाबत व इतर माहिती*"

तद्‌नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१५/२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र.१ ते ४ बाबत माहिती आरटीआय कायद्याच्या तरतूदीनुसार देय असलेली माहिती १५ दिवसात विनामूल्य परस्पर उपलब्ध करून दयावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला की, तक्रारदार यांना दि.२२/४/२०२१ च्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरूपाची असल्याने कलम ८ (१) (त्र) अन्वये नाकारलेली आहे.

तक्रारदार यांनी मागणी केलेली माहितीचे अवलोकन केले असता दिसते की, त्यांनी " १) *सौ मिनाक्षी विवेक बर्वे सह शिक्षिका ना.मा.वि यांचे नेमणुक पत्र झेरॉक्स, २) सौ.मिनाक्षी विवेक बर्वे यांनी घेतलेल्या अर्जित रजा १४/६/१९९० ते ३१/१/२१, ३) नालंदा माध्य.विद्यालय शिक्षक रजा रजिस्टर झेरॉक्स १४/६/१९९० ते ३१/१/२०२१*

*झेरॉक्स प्रत, ४) सौ.मिनाक्षी विवेक बर्वे यांच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स १४/६/१९९० ते ३१/१/२०२१ माहिती* ." अशी माहिती मागितली आहे. या माहितीपैकी मुद्दा क्र.२, ३ व ४ ची माहिती वैयक्तिक स्वरूपाची आहे. तथापि मुद्दा क्र.१ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविणे आवश्यक होते, ही माहिती वैयक्तिक स्वरूपाची आहे असे म्हणता येणार नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ची माहिती **तक्रारकर्ता यांना १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३